नरेगा अंतर्गत ग्रामपंचायत
स्तरावर देखरेख व दक्षता
समिती गठित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शासन परिपत्रक क्रमांक- भानिम-२०१६/ प्र.क्र.८५ /रोहयो- १०
मंत्रालय, मुंबई-४०००३२,
दिनांक :- १३ ऑक्टोबर, २०१६

वाचा:- १) ग्रामीण रोजगार हमी योजना अधिनियम, २००५ ऑपरेशनल मार्गदर्शक सुचना २००८ मधील परि. क्र. १०.१.२ व १०.३.१
२) मास्टर सर्क्युलर २०१६-१७ मधील परिच्छेद क्रमांक २.९.५.३

परिपत्रक:-

केंद्र शासनाच्या राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, २००५ (नरेगा) ऑपरेशनल मार्गदर्शक सुचना मधील परिच्छेद १०.१.२ मध्ये स्पष्ट करण्यात आले आहे की, या कार्यक्रमांतर्गत कामे सुरू असताना, कामांची प्रगती आणि गुणवत्ता यांच्या संनियंत्रणासाठी जिथे कामे चालू आहेत तेथील स्थानिक लोकांचा सहभाग असलेली ग्रामपंचायत स्तरावर स्थानिक देखरेख व दक्षता समिती (VMC) गठित करण्यात यावी.

२. केंद्र शासनाच्या उपरोक्त सुचनांप्रमाणे राज्यामध्ये अद्यांप ग्रामपंचायत स्तरावर स्थानिक देखरेख व दक्षता समिती गठीत करण्यात आलेल्या नाहीत असे निदर्शनास आले आहे. या अनुषंगाने केंद्र शासनाच्या मास्टर सर्क्युलर २०१६-१७ मध्ये परि. क्रमांक २.९.५.३ नुसार दिलेल्या सुचनांच्या अनुषंगाने राज्यात सदर समिती स्थापन करण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत त्यानुसार संबंधितांनी तात्काळ कार्यवाही करावी.

३. नरेगाच्या मार्गदर्शक सुचनांत विहित केल्याप्रमाणे प्रत्येक जिल्ह्यात ग्रामपंचायत स्तरावर ५ सदस्य असलेली स्थानिक देखरेख व दक्षता समिती (VMC) नेमण्यात यावी. त्यामध्ये अनु. जाती/ जमाती आणि महिला यांना प्रतिनिधीत्व देण्यात यावे. समितीमधील सदस्यांची निवड शिक्षक, आंगणवाडी सेविका, बचत गट (SHG), नरेगा मजूर, युथ क्लब , नागरी समाज संघटना यांचे प्रतिनिधी, सोशल ऑडीट संसाधन व्यक्ती यांचेमधुन निवडण्यात यावी. स्थानिक देखरेख व दक्षता समितीतील सदस्याची स्थापना, निवड, ग्रामसभा ६ महिन्याच्या कालावधीसाठी करील. सदर समितीच्या कार्यकक्षेत कामांना भेटी देणे, मजुरांशी संवाद साधणे, रेकॉर्ड तपासणे, कामावरच्या सुविधांची तपासणी करणे, कामांच्या गुणवत्तेचे मुल्यांकन करणे, खर्चाचे मुल्यांकन करणे, काम संपेपर्यंत कामांचा अहवाल सादर करणे, गुणात्मक कामाचे मुल्यांकन करणे इ. बाबींचा समावेश असेल. स्थानिक देखरेख व दक्षता समिती सर्व कामांची तपासणी करून त्याबाबतच्या मुल्यमापन अहवालाची वर्क रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल व सदर अहवाल सामाजिक अंकेक्षण दरम्यान ग्रामसभेला सादर करण्यात येईल. सदर समितीचा अहवाल

सार्वजनिक दस्तऐवज समजुन तो ग्रामपंचायतीला त्यांच्या मागणीनुसार उपलब्ध करून देण्यात येईल.

४. उपरोक्तप्रमाणे केलेल्या कार्यवाहीबाबत सर्व जिल्हाधिकारी यांनी शासनास अहवाल सादर करावा.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१६१०१३१३२१४५५४१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( डॉ. प्रमोद शिंदे)
उप सचिव (रोहयो), महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव, महाराष्ट्र यांचे स्वीय सहायक,
प्रधान सचिव, वित्त विभाग,
आयुक्त नरेगा, नागपूर
विभागीय आयुक्त सर्व,
जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक सर्व,
मुख्य कार्यकारी अधिकारी, तथा सह कार्यक्रम समन्वयक जिल्हा परिषद सर्व,
उप सचिव, रोहयो
रोहयो प्रभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती, रोहयो -१०